## निशाणी क्र.११ वरील आदेश
## (दि.१६/०८/२०२२)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आज्ञा ०६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याबाबत दाखल केला आहे.

२. वादीतर्फे ॲड. श्री. एन. आर. मापारी व प्रतिवादी तर्फे ॲड. श्री. आर. एन. तायडे यांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादीने कथन केले की, प्रस्तुतचा दावा रक्कम वसुलीसंबंधी दाखल केला आहे. दाव्यातील परिच्छेद क्र.१ मधील ओळ क्र.२ मध्ये ''महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०'' असे टंकलेखकाच्या नजर चुकीने झाल्यामुळे त्याऐवजी ''मल्टीस्टेट को. ऑपरेटीव्ह सोसायटी ॲक्ट २००२'' अशी दुरुस्ती होणे न्याय व आवश्यक आहे. त्यामुळे दुरुस्ती केल्यास मुळ दाव्यात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करणे गरजेचे आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला.

४. प्रतिवादीने हरकत घेतली की, वादीने जी दुरुस्ती करुन मागितली आहे, ती मंजुर झाल्यास दाव्याचे स्वरुप बदलुन जाते. त्याचप्रमाणे दुरुस्ती मंजुर झाल्यास प्रस्तुतचा दावा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात न राहता सहकार न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात जाणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा, अशी विनंती त्यांनी केली.

५. मुळ दावा वादीने प्रतिवादी यांच्याकडुन रुपये दोन लाख वसुल होवुन मिळणेकरीता दाखल केला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दाव्यामध्ये दि.०२.०३.२०२१ रोजी मुद्दे निश्चीत करण्यात आलेले असुन प्रस्तुतचा दावा पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. वादीने मुळ दाव्यामध्ये परिच्छेद क्र.१ मध्ये वादी संस्थेचे कामकाज काय आहे व ती कशा अंतर्गत नोंदणीकृत आहे याचे वर्णन केले आहे.

६. वादीने मुळ दाव्यात परिच्छेद क्र.१ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० असे नमुद केले आहे. त्याऐवजी ''मल्टीस्टेट को. ऑपरेटीव्ह सोसायटी ॲक्ट २००२'' अशी दुरुस्ती वादीस करावयाची आहे. वादीने मागणी केलेली दुरुस्ती ही केवळ औपचारीक स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. मुळ दावा वादीने आगाऊ रक्कम रुपये दोन लाख प्रतिवादीकडुन वसुली होवुन मिळणेकरीता दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तावीत दुरुस्ती मंजुर झाल्यास मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही.

७. वादीने मागणी केलेली दुरूस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. त्याचप्रमाणे मागणी केलेली दुरूस्ती गरजेची आहे. दुरूस्ती नामंजुर झाल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत होऊन वादीला नाहक दुसरा दावा भविष्यात दाखल करावा लागु शकतो. त्यामुळे भविष्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) वादीस प्रस्तावीत दुरुस्ती करण्याची परवानगी रुपये १००/– च्या खर्चासह देण्यात येते. खर्चाची रक्कम प्रतिवादीस देण्यात यावी.

३) वादीने मागणी प्रमाणे दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

४) पक्षकारांनी नोंद घ्यावी.

Digitally signed by
SACHIN BHAGVAT
SHIRSATH
Date: 2022.08.23
12:02:01 +0530

(**स. भा. शिरसाठ**)

दिनांक १६/०८/२०२२

दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
घनसावंगी.